झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
पहिला मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११०१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/२७९१ /२०२५
दिनांक :-२८/१० /२०२५.

"जाहीर नोटीस"
(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

प्रस्तावना-

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **"उपरोक्त अधिनियम"** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. आणि,

२) ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि,

३) ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियोजन आहे. आणि,

४) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसली तरी सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्र. झोनिपु/०४/कावि/४०/२०२४, दि.१६/०२/२०२४ अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व प्र.सक्षम प्राधिकारी क्र.३ झोपुप्रा, पुणे यांनी देखील दि.०३/१०/२०२५ रोजी स्थळपाहणी करून दाखल केलेला स्वतंत्र अहवाल पाहता सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याजोगी परिस्थिती आहे. आणि,

५) ज्याअर्थी, खालील अनुसूची मध्ये नमूद केलेल्या झोपडपट्टी व्याप्त क्षेत्राचे त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार ८६३५.७७ चौ.मी. इतके क्षेत्र आहे. तसेच स्थलांतरणाने पुनर्वसन प्रस्तावित असलेल्या MIDC प्लॉट नं.GP -३१, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी येथे स्थलांतरण प्रस्तावित आहे. आणि,

६) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचा शासकीय मोजणी नकाशा सादर झालेनंतर त्यानुसार येणारे योजनेचे क्षेत्र व चतु:सिमा अंतिम करून सदर प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र अंतिम करण्यात येईल. आणि,

**७) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमिन मालकांना ३०**

दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील " असे नमूद केले आहे. आणि,

८) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भातील आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदर क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पूर्वसूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

(२) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत सदर क्षेत्र उक्त कलमाखाली “झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र” म्हणून घोषित करण्यासंदर्भात आवश्यक तो निर्णय गुणवत्तेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची क्र.१
## सध्या अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचे क्षेत्र

**झोपडपट्टीचे नाव** :- सि.स.नं.३००७ ते ३०३०, ३०३२, ३०३५ ते ३०३७, ३०४० ते ३०४७, ३०४९ ते ३०५१, ३०५३ ते ३०५६, जुना (स.नं.१४,१५ नविन स.नं.१२/१), सुभाषनगर, पिंपरी, जिल्हा-पुणे (Non Buildable)

**महानगरपालिका क्षेत्र** :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (त्रिमितीय पध्दतीने येणारे क्षेत्र) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं.३००७ ते ३०३०, ३०३२, ३०३५ ते ३०३७, ३०४० ते ३०४७, ३०४९ ते ३०५१, ३०५३ ते ३०५६, जुना (स.नं.१४,१५ नविन स.नं.१२/१), | महाराष्ट्र शासन | ८६३५.७७ | स.नं.१४ व १५ ची उर्वरित मिळकत व लागू रस्ता | लागू पवना नदी | स.नं.१४ ची उर्वरित मिळकत व लागू श्री. झुलेलाल मंदिर लागु मिलिंदनगर, पिंपरी | लागू रस्ता व स.नं.१५ ची उर्वरित मिळकत |

## अनुसूची क्र.२

ज्या ठिकाणी पुनर्वसन करावयाचे ते क्षेत्र

झोपडपट्टीचे नाव :- MIDC प्लॉट नं.GP -३१, पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, जिल्हा- पुणे.

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| पिंपरी औद्योगिक क्षेत्र, आकुर्डी, पुणे | MIDC प्लॉट नं.GP -३१ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (भाडेपट्टाधारक - मे. रेनबो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी.) | १८१५३.०० चौ.मी. | शाळा जी.पी १३१, O/S II play ground | २४.०० मी रस्ता | १८.५ मी रस्ता | MIDC ESR, Plot No. GP १९७ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक :- २७ / १० /२०२५.

27/11/2025

(सतीशकुमार खडके) (भा.प्र.से)

मुख्य कार्यकारी अधिकारी,

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,

पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

प्रत-

१. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (पूर्वसूचना) या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.